## हीराबेन यांना समर्पण

काल मी जे स्वप्न पाहिले
जीवनाचे सार्थक जणु की
'मेरा लाडला' देशभक्तीने
प्रेरित होऊन झगडत होता
देह आपुला झिजवित होता
जीवन समर्पित करीत होता ।
रात्रंदिन त्याच्या डोळ्यापुढती
राष्ट्रोद्धार ध्येयच होते
साधी राहणी उच्च विचारसरणी
त्याच्या जीवनकार्यी होते ।
नकलीपणाचे ढोंगही नव्हते
देशभक्तीची आस आणखी
कर्तृत्वाची दृढता होती
डगमगणारी हरण्याची
जीवनधारा नव्हतीच
महापुरुष त्याचे मार्गदर्शक होते ।
नम्रता कणाकणात होती
दृढता स्वभावात होती
देशभक्ती रोमारोमात होती
झपाटलेला ध्येयप्रेरित हा
असा लाडला माझा होता ।
स्वप्नंच ते हो भंग पावले
कारण हिराबेन मी नव्हते
साधी एक मी गृहिणी होते
अगदी सामान्यच गृहीणी होते ।
हिराबेन तर ती माता हो
जिने अद्वितीय नरेंद्रला जन्म दिला
जिने भारताला सन्मान दिला
म्हणतातच ना,
पुत्र असावा बंडा, ज्याचा तिन्ही लोकी झेंडा
अशी ही माता तिला माझा सादर प्रणाम!

- **पद्मा नेने** (फ्रॅन्कफोर्ट, इलिनॉय)

***

- **पद्मा नेने** (फ्रॅन्कफोर्ट, इलिनॉय)



विविध रंगांनी विविध ढंगानी विविध पोशाख विविध खाद्यसंस्कृतीने नटलेला भारत; सर्व शास्त्रांचा उहापोह असलेले चतुर्वेद अध्यात्माचे माहेरघर; अलौकिक महापुरुषांची भूमी- वीरभूमी परचक्राने पराभूत वाटणारी आमची मातृभूमी; मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम, भगवद्गीता सांगणारे भगवान श्रीकृष्ण, गौतमबुध्द, महावीर, नानकजी, संत ज्ञानेश्वर यासारख्या अलौकिक विभूतींचा भारतदेश असहाय्य झालेला वाटत असताना आशेचा किरण दिसावा असा एक युगपुरुष कलियुगात जन्मावा हे आपले महतभाग्य होय. भारतीयांच्या मनाला उभारी मिळाली. जगात भारताला पुन्हा महत्त्व मिळाले. यांचे श्रेय माननीय श्री मोदींना जाते. त्यांच्या व्यक्तिमत्वावर लिहिलेली सोबतची कविता त्यांच्या मातेस- हीराबेन यांना समर्पण!

***